| MHCO100000952009 | दाखल ता. | : | २५/०३/२००९ |
|---|---|---|---|
| | नोंदणी ता. | : | २५/०३/२००९ |
| | निकाल ता. | : | ०३/०८/२०२६ |
| | कालावधी : १७व. ०४म. १०दि. | | |

**सांगली येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती ए. जे. पाटील)**

**सहकारी वाद क्र. : ६०१/२००९**

१. श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था लि. देशिंग,
ता. कवठेमहांकाळ
शाखा – देशिंग, तर्फे वसुली अधिकारी
श्री. नामदेव हरी माने, व. व. ३७,
रा. देशिंग, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली
} **वादी**

**विरुध्द**

१. श्री. वसंत बाळू देसाई (मयत)
वारस १अ) पद्मिनी वसंत देसाई
व. व. ७२, धंदा: घरकाम
१ब) सुकुमार वसंत देसाई
व. व. ४५, धंदा: शेती
१क) सुनिल वसंत देसाई
व. व. ४२, धंदा: नोकरी
प्रतिवादी क्र. १अ ते १क रा. मु. पो. देशिंग,
ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली

२. श्री. नानासो सिताराम खानविलकर
व. व. ५७, धंदा: शेती
रा. मु. पो. देशिंग, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली
} **प्रतिवादी**

३. श्री. नारायण गणपती गुरव (मयत)
वारस ३अ) चंद्रकांत नारायण गुरव
व. व. –, धंदा: शेती
३ब) रोहिणी नारायण गुरव
व. व. –, धंदा: घरकाम
प्रतिवादी क्र. ३अ व ३ब रा. देशिंग,
ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली
३क) मनिषा राजाराम गुरव
व. व. –, धंदा: घरकाम
रा. बनाळी, ता. जत, जि. सांगली

**प्रतिवादी**

.................................................................................................

**दावा : रक्कम रु. ७३,३३७/– व्याजासह वसुलीसाठी**

.................................................................................................

.................................................................................................

वादीतर्फे वकील : ॲड. ए. ए. पितांबरे.
प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क: एकतर्फा

.................................................................................................

## <u>निकालपत्र</u>

## (घोषित दिनांक : ०३/०८/२०२६)

प्रस्तुत दावा वादी सहकारी पतसंस्थेने रक्कम रु ७३,३३७/– द. सा. द. शे. १७ टक्के व्याजदराने प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांचेकडून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वसुल होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी संस्थेने दाखल केलेला प्रस्तुत दावा या न्यायालयाने दि. ०३/०७/२०१२ रोजी वादीच्या पुराव्याअभावी काढून टाकला होता. तद्नंतर वादी यांनी किरकोळ अर्ज क्र. ०८/२०२० दाखल करुन सदर दावा दि. १६/१०/२०२५ रोजी झालेल्या आदेशानुसार फेरफैलावर घेतला.

## वादींची कथने थोडक्यात खालीलप्रमाणे:-

१. वादी सहकारी पतसंस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंद झालेली सहकारी संस्था आहे. जिचा उद्देश ठेवी स्विकारणे व आपल्या सभासदांना कर्जाची उपलब्धता करुन देणे असा आहे. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी नं. १ ते ३ हे वादीचे सभासद असुन प्रतिवादी क्र.१ हे संस्थेचे कर्जदार व प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ च्या कर्जास जामिनदार होते.

२. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ याने वादी संस्थेकडून कर्जाची मागणी केली होती. वादी सहकारी पतसंस्थेने रक्कम रु. ४५,०००/- चे कर्ज मंजूर करुन प्रतिवादी क्र. १ यांना दि. २९/०१/२००३ रोजी वितरित केले. सदर कर्जासाठी प्रतिवादी क्र. २ व ३ हे जामिनदार राहिले आहेत. उभय पक्षांमध्ये कर्जास व्याजदर द.सा.द.शे. १५ टक्के दराने देणेचे ठरले आहे. तसेच प्रतिवादींनी कर्जाची परतफेड मुदतीत न केल्यास २ टक्के दंडव्याज आकारण्याचे उभय पक्षकारांमध्ये ठरले आहे. पुढे या प्रतिवादींनी सदरील कर्जासाठी वादी संस्थेच्या हक्क संबंधित कागदपत्रे जसे की, कर्ज रोखा, वचन चिठ्ठी, तारण बॉण्ड इ. कागदपत्रे करुन दिली व सदर रक्कम कर्ज स्वरुपाने घेतली व कराराप्रमाणे परतफेड करण्याचे कबुल केले.

३. तथापि, प्रतिवादी क्र. १ यांनी कराराप्रमाणे अगर वारंवार मागणी करुनही कर्ज रक्कम परतफेड केलेली नाही. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कर्ज रक्कम पुर्ण अगर कराराप्रमाणे परतफेड केली नाही व दि. ३१/०५/२००८ अखेर प्रतिवादीकडून खर्चासह रक्कम रु. ७३,३३७/- येणे असल्याचे कथन केले आहे. पुढे असे कथन आहे की, सदरील थकीत रक्कम वादींनी प्रतिवादींकडे वारंवार मागणी करुनही अथवा नोटीस देऊनही भरणा केलेली नाही, त्यामुळे वादींना येणे रक्कम वसुल करण्याकरिता प्रस्तुतचा दावा करणे भाग पडले आहे.

४. प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांना सदर दाव्याचे समन्स काढण्यात आले परंतु बजावणी होऊनही प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व

३अ ते ३क हजर झाले नसल्याने त्यांचे विरुध्द दि. ०६/०७/२०२६ रोजी नि. १ वर एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

५. या प्राप्त परिस्थितीत वादी यांनी त्यांच्या दाव्याच्या मागणीचे पृष्ट्यर्थ त्यांचे अधिकृत इसम नामे अनिल ज्ञानू पांढरे यांची नि. ३९ वर शपथेवर दिलेली लेखी जबानी सादर केली. शपथेवर दिलेल्या लेखी जबानीमध्ये साक्षीदार यांनी दावा अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे पुन: मागणी केली. वादी यांनी नि. ३ अन्वये प्रतिवादीसोबत झालेल्या करारासंदर्भाबाबतची साक्षांकित व मुळ कागदपत्रे सादर केली. जसे की, संचालक मंडळाचे दि. १३/०१/२००९ रोजीच्या सभेपुढील ठराव प्रत नि. ४० व ४१, कर्ज मागणी अर्ज नि. ४२, कर्ज रोखा नि. ४३, वचनचिठ्ठी नि. ४४, प्रतिज्ञापत्र नि. ४५, शिफारसपत्र नि. ४६, ८अ उतारा नि. ४७,७/१२ उतारा नि. ४८, नोटीस नि. ४९, पोहोच नि. ५०, कर्ज खातेउतारा नि. ५१ इ. वादी साक्षीदाराने या कागदपत्रावरील सह्या ओळखल्या व तसेच त्यातील मजकूर सिध्द करुन दाखविले. तसेच वादी साक्षीदाराने खातेउतारा नि. ५१ सादर केला व त्यातील असलेल्या नोंदी सिध्द केल्या आहेत.

६. सदरील तोंडी व लेखी पुरावा तपासुन पाहिला असता, प्रतिवादी क्र. १ ने कर्ज रक्कम रु. ४५,०००/– घेतली असल्याचे व त्यास प्रतिवादी क्र. २ व ३ जामिनदार राहिल्याचे सिध्द होत आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व ३ मयत झालेने वादी यांनी त्यांचे वारस न्यायालयाचे हुकूमाप्रमाणे दाव्यात सामील केले. प्रतिवादी क्र. १ चे वारस – १अ ते १क, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ३ चे वारस – ३अ ते ३क यांना पुरेशी संधी देऊनही काहीही हरकत अथवा विरोध दर्शविला नाही. त्यामुळे सदरच्या खाते उता–यावरील नोंदी ह्या निर्विवाद सिध्द होत आहेत. त्यावरुन असे सिध्द होते की, प्रतिवादी क्र. १ यांनी घेतलेल्या रकमेची पुर्णत: परतफेड केली नाही. त्यामुळे प्रतिवादींचे वारस त्यांच्या पुर्वाधिकारी यांनी घेतलेल्या कर्ज रक्कमेस त्यांना प्राप्त झालेल्या मिळकतीच्या प्रमाणात कर्जफेडीस जबाबदार आहेत. खातेउतारा तपासला असता दि. ३०/०६/२००८ अखेर बाकी रक्कम रु. ७४,१५१/– थकित असल्याचे दिसून येत आहे. परंतु वादी यांनी दाव्यात व पुराव्यात र. रु. ७३,०३७/– रक्कमेची व्याजासह मागणी दि. ३१/०५/२००८

रोजी केल्यामुळे ती मागणी मान्य करणेत येत आहे. तेव्हा या तोंडी व लेखी पुराव्यावरुन वादी हे प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांच्याकडून रक्कम रु. ७३,०३७/– वसुलीस पात्र आहेत. तेव्हा या तोंडी व लेखी पुराव्यावरुन वादी हे प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांच्याकडून रक्कम रु. ७३,०३७/– तसेच दि. ०१/०६/२००८ पासून सदर रकमेवर पुढील व्याज कर्ज कागदपत्राप्रमाणे प्रतिवर्षी १९ टक्के दराने वसुल करण्यास पात्र आहेत. प्रतिवादी क्र. १अ ते १क हे मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस प्रतिनिधी व प्रतिवादी क्र. ३अ ते ३क हे मयत प्रतिवादी क्र. ३ चे वारस प्रतिनिधी असल्यामुळे भारतीय करार कायद्यानुसार त्यांची कर्जफेडीची जबाबदारी त्यांना मयत प्रतिवादीकडून मिळालेल्या स्थावर व जंगम मिळकती इतकीच मर्यादित राहिल. वादींनी दंडव्याजाची मागणी केली आहे, परंतु खातेउता–याचे परिक्षण करता वादींनी चक्रवाढ व्याजाने आकारणी केलेली आढळलेने सबब दंडव्याजाची मागणी नामंजूर करणेत येत आहे. तसेच इतर खर्चाची रक्कम योग्य पुराव्याअभावी नामंजूर करणेत येत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांनी वादी यांना रक्कम रु. ७३,०३७/– वैयक्तिक व संयुक्तिकरित्या देणेचे आहे. तसेच सदर रकमेवर पुढील व्याज प्रतिवर्षी १९% प्रमाणे दि. ०१/०६/२००८ पासुन ते रक्कम फिटेपर्यंत देणेचे आहे.

३. प्रतिवादी क्र. १अ ते १क व प्रतिवादी क्र. ३अ ते ३क यांची कर्ज परतफेडीची जबाबदारी त्यांना अनुक्रमे मयत प्रतिवादी क्र. १ व ३ कडून प्राप्त झालेल्या स्थावर व जंगम मिळकती इतकीच मर्यादित असेल.

४. वादी कायदेशीर प्रक्रिया राबवून प्रतिवादीच्या स्थावर व जंगम मालमत्ता विक्रीतुन आदेशित रक्कम वसुल करु शकतात.

५. प्रतिवादी क्र. १अ ते १क, २ व ३अ ते ३क यांनी दाव्याचा खर्च ही वादीस देणेचा आहे.

६. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात जाहीर)

ANUSAYA JAGANNATH PATIL

Digitally signed by ANUSAYA JAGANNATH PATIL
Date: 2026.08.03 16:56:51 +0530

(श्रीमती ए. जे. पाटील)

सांगली न्यायाधीश,

दिनांक : ०३/०८/२०२६ सहकार न्यायालय क्र. २, सांगली